VOL. 5 | ISSUE 3 | MARCH 2019

260


ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

UGC SPONSORED [illegible]
National Seminar

## CHALLENGES BEFORE INDIAN AGRICULTURE AND REMEDIES



Guest Editor
Dr. M. V. [illegible]

Organized by
The Department of Economics
Nanded Education Society's
**People's College, Nanded**
College with Potential for Excellence
Re-accredited with Grade 'A'

Est. 1950

Scanned by Scanner Go

## ९. मुलींच्या विवाहाचा खर्च

मुलीच्या लग्न.चा खर्च हा प्रतिष्ठेपायी केला जातो. ता आधुनिकाळात सतत वाढत आहे. मुलगी शहरात राहण्यासाठी सरकारी नौकरदारांना देण्यात शेतकयांची स्पर्धा वाढली. यातुनच हुंडे वाढले व विवाह थाटामाटात करण्याची स्पर्धा वाढली. हे सर्वांनाच शक्य होते असे नाही. ज्यांना शक्य नाही ते आपल्या मनाला खंत करत आत्महत्या करतात.

## १०. दारिद्रय

भारतात लहान व मध्यम शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यातही अल्पभुधारक व अत्यल्प भुधारकांची संख्या जास्त आहे. शेतीचे क्षेत्र कमी असल्यामुळे यांत्रिकोकरण, आधुनिक खते, बियाणे यांचा वापर भारतीय शेतकरी करु शकत नाही. उत्पादन कमी म्हणुन उत्पन्न कमी म्हणजेच शेतीत गुंतवणुक कमी पर्यायाने उत्पन्न कमी अश दुष्टचक्रात भारतीय शेतकरी अडकला आहे.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना

भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ढाभल मानाने पुढील उपाय योजना करता येतील

१. कर्जामाफी व स्वस्तात कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे
२. सिंचन सुविधेमध्ये जास्तीत जास्त वाढ करण्यात यावी.
३. पिक विमा योजनेची प्रभावी अमलबजावनी करणे आवश्यक आहे.
४. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थीतीत सुधारणा करण्यासाठी विणन व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे.
५. उत्पादन खर्चावर आधारीत हमीभाव देणे आवश्यक आहे.
६. सहकारी संस्थाची उभारणी ही वास्तवीकपणे करणे गरजेचे आहे.
७. शेतीला जोड धंदायाची साथ देऊन दुग्ध व्यावसाय ,कुकुट पालन, शेळीपालन इ. योजना शासनाने प्रोतसान दयावे.
८. शेतकऱ्याच्या मुलींच्या विवाह साठी सामुदाईक विवाह १६ व्या आयोजीत करावे.
९. शासनाने शेतकऱ्याच्या मुलामुलीना उच्च व व्यावसाईक शिक्षण मोफत स्वरूपात दयावे.
१०. शेतकऱ्याच्या शेतमालाला डॉ. स्वामीनाथन यांच्या अहवालानुसार उत्पादन खर्चा अनुसार शेतीमालाला भाव दयावा.

## संदर्भग्रंथ

१. Indian Economy-V.K.Puri,S.K.Misra.३२nd revised Himalaya Publishing House, Edition २०१४.
२. भारतीय अर्थव्यवस्था-प्रा.रायखेलकर,डॉ.दामजो.विद्या बुक्स पब्लिशस,औरंगाबाद २०१३,
३. कृषि व ग्रामिण अर्थशास्त्र-डॉ.विजय कविमंडन,श्री मंगेश प्रकाशन, नागपुर २०१२.
४. कृषि अर्थ शास्त्र-वसुधा पुरोहित, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद २०१६
५. बोकारे दिनर- शेतकऱ्याच्या आत्महत्या डायमंड प्रकाशन पुणे.

❑❑❑

264



Scanned by Scanner Go

भावात चढ-उतार होत असतात. यातुनच शेतकऱ्यांची मानसिकता बिघडते व तो आत्महत्या करतो.

२. कर्जबाजारीपणात वाढ

भारतात शेती क्षेत्रात पतपुरवठया च्या बाबतीत सुरुवातीपासूनच दुय्यम स्थान दिले आहे. शेतकऱ्यांना लवकर कर्ज मंजूर होत नाही. झाले तर त्याचे व्याजदर अधिक असते. वेळेवर कर्ज मिळत नाही म्हणुन भारतीय शेतकरी खाजगी सावकाराकडुन कर्ज घेतो. भारतीय शेतकऱ्याबाबत एक म्हण आहे' भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो व कर्जातच मरतो' शेतकरी कर्ज बँकाडुन घेऊन ते मुलीचे विवाह व इतर अनुत्पादक कार्यासाठी वापरतात. अनुत्पादक कार्यासाठी वापरल्यामुळे त्यांचे कर्ज थकबाकीत जातात. बँकेची थकबाकी वाढली की ते खाजगी सावकाराकडुन कर्ज घेतात. खाजगी सावकार द.सा.द.शे. ५०% ते ६०% एवढे व्याज लावतो. दोन वर्षात रक्कम दुप्पट होते. कर्जाचा बोजा वाढला की, शेतकरी आत्महत्या करतो.

३. चुकीचे आयात- निर्यात धोरणे

शहरी मध्यवर्गीयांना स्वस्तात अन्नधान्य, भाजीपाला,साखर, कांदा, या शेतीशी संबंधित वस्तु मिळाव्यात सरकार भारतीय कृषीमाला चुकीची निर्यात बंदी लादतात. या वस्तुवर निर्यात बंदी लावण्यासाठी या वस्तु जीवनावश्यक वस्तुच्या यादीत टाकल्या आहेत. सध्या कांदा जीवनावश्यक वस्तु टाकला आहे. तो आकण्यासाठी कोणते नियम लावले हे माहित नाही. फक्त प्रसारनाध्यम मध्यसवर्गीयासाठी टाहो फोडतात एवढेच कारण. ज्यावेळी शेतमालाचा तुवटडा होतो, भाववाढ होते तेंव्हा निर्यात बंदी करुन शेतमालाचे भाव पाडण्याचे काम शासन करते यासाठी निर्यातीवर मोठया प्रमाणात कर लावल्या जातो किंवा ती बंद केली जाते.

४. शेतीची कमी उत्पादकता

भारतीय शेतीच्या तुलनेत इतर देशाच्या पिंकाची उत्पादकता ही जास्त आहे. भारतात यांत्रिकरणासाठी शेतकऱ्यांजवळ भांडवल नाही. भारतात कृषी संशोधनाकडे दुर्लक्ष झाले आहे. जास्त उत्पादन देणाऱ्या नविन जाती विकसित झाल्या नाहीत. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचे तुकडे झाले आहेत. त्यामुळेही शेतीची उत्पादक कमी झाली आहे. शेतीच्या कमी उत्पादकतेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते शेती त्याला परवडत नाही.

५. अपुरी शासकीय यंत्रणा

हमीभावाने शेतमाल खरेदी करण्यासाठी शासनाकडे असलेली यंत्रणा अपुरी आहे. सध्या महाराष्ट्रात नाफेड तर्फे तुर केंद्र चालु आहेत. दोन-तीन तालुक्यात मिळुन एक खरेदी केंद्र आहे. एक महिना तुरीचे वजन काटा घेण्यासाठी तर काटा झाल्यावर धनादेश मिळण्यासाठी १५ दिवस लागतात. धनादेश हा राष्ट्रीयकृत बँकेचा असतो. त्या बँकेत शेतकऱ्यांचे खाते नसल्यास इतर बँकेस जमा होण्यास पुन्हा आठ दिवस म्हणजेच जवळपास शेतमालाचे पैसे माल विक्रीला आणण्यापासुन दीड ते दोन महिने पैसे मिळण्यासाठी या व्यवस्थेत लागतात. यातुनच शेतकऱ्यांना पैशाची गरज असते. पैसे वेळैवर न मिळाल्यामुळे ते आत्महत्यता करतात.

६. असंतुलीत विकास

स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनेच्या साहयाने भारताने प्रगती केली. प्रगती करताना शेतीक्षेत्राला दुय्यम स्वरुपाची वागणुक देण्यात आली. यामुळे इतर क्षेत्राच्या तुलनेत शेती अविकसित राहिली. इतर क्षेत्रातील लोकांच्या तुलनेत शेतकऱ्यांचे उत्पन्नही अल्प स्वरुपाचे राहिले. शेतकरी आपल्या दैनंदिन गरज भागवू शकेल एवढेही उत्पन्न त्याला मिळेनासे झाले यातुन निराश होऊन शतकरी आत्महत्या करु लागले आहेत.

७. सिंचनाचा अभाव

भारताला स्वतंत्र्य मिळुन ७२ वर्षे झाली तरीही भरतातील ३० % शेतीच सिंचनाखाली आली. ७०% शेती ही कोरडवाहु आहे. निसर्गाच्या लहरीवर अवलंबुन आहे. भारतात बऱ्याचवेळा दुष्काळ पडतो. अनियमित पाऊस पडतो. पावसातखंड पडतो. यामुळे पिंके करपुन जातात, उत्पादन कमी होते. शेतकऱ्याला उत्पन्न कमी झाल्यामुळे त्यांचा खर्च निघत नाही. तसेच सिंचनाचा भौतिक सुविधेचाही अभाव भारतात आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन यावरील अनुदान शासनाने कमी केले आहे. जे देते तेही पाच पाच वर्ष मिळनावे झाले. या सर्वांचा परिणाम शेतकऱ्याच्या मानसिकतेवर होतो व तो आत्महत्या करतो.

८. शेतकऱ्यांचे अज्ञान

भारतीय शेतकऱ्यामध्ये आजही मोठया प्रमाणात अज्ञान आहे. आजच्या डिजीटल युगात, माहिती तंत्रज्ञानाच्या साहयाने बाजारपेठेचा अभ्यास करता येतो. परंतु अज्ञानामुळे भारतीय शेतकरी जगाच्या बाजारपेठेचा अभ्यास करु शकत नाही. कोणत्या मालाल भविषय भाव राहील. आज काठे जास्त भाव हे पाहु शकत नाही. परंपरागत पध्दतीचे आपली मेहनत करतो त्यात त्याचा तोटाच होतो त्यामुळे तो आत्महत्या करतो.



Scanned by Scanner Go

# भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्या : एक चिकित्सक अभ्यास

*डॉ.एस.एस. देवनाळकर

## प्रास्ताविक

भारतीय अर्थव्यवस्थेसमोर ज्या काही प्रमुख समस्या आहेत त्या सर्व समस्यापैकी उगृ रुप धारण करणारी समस्या म्हणजे भारतीय शेतीक्षेत्रामध्ये शेतकऱ्याच्या होणाऱ्या आत्महत्या ही समस्या आज प्रकर्षाने मोठया प्रमाणात जाणवते. भारत हा कृषी प्रधानदेश असून ही आज भारतामध्ये शेतकऱ्याना आत्महत्या कराव्या लागत आहेत. ही एक अतिषय चिंताजनक बाब आहे. शेतकरी आत्महत्योमागील महत्वाचे कारण म्हणजे वाढता कर्जबाजारापणा होय. शेतकरी कर्जातच जन्मतो व कर्जातच मरतो अशी विचित्र परिस्थिती आज पहायला मिळते.

भारताला पुर्वीच्या काळी सोन्याचा धुर निघणारा देश म्हटले जायचे. भारतात एक म्हण प्रचलित होती. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ट नौकरी मात्र आज उलट परिस्थिती झाली आहे. उत्तम नौकरी, मध्यम व्यापार, कनिष्ट शेती, सर्वांना जगण्यासाठी अन्न लागते आणि अन्नदात्या शेतकऱ्याची दशा आज खूप वाईट झालेली आपणास दिसून येते.

सद्यस्थितीत भारतामध्ये ६५% लोक शेती व शेतीशी संबंधित व्यवसायामध्ये गुंतलेले आहेत. तसे पहाता अनेक उद्योगाची जननी कृषी आहे. तरी परंतू कृषी क्षेत्रातील राष्ट्रीय उत्पन्नात फक्त २५% योगदान आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्या या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## संशोधन लेखाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधन लेखाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. भारतातील अलिकडील काळातील शेतकऱ्याच्या आत्महत्येची आकडेवारी लक्षात घेणे.
२. भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्येमागील कारणाचा शोध घेणे.
३. भारताताातील शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय सुचविणे.

* अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक,
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा. जि.लातुर

**भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्येची आकडेवाडी.**

| अ.क्र. | वर्ष | शेतकऱ्याच्या आत्महत्या |
|---|---|---|
| १ | २००१ | १६४१५ |
| २ | २००२ | १७९७१ |
| ३ | २००३ | १७१६४ |
| ४ | २००४ | १८२४१ |
| ५ | २००५ | १७३७१ |
| ६ | २००६ | १७०६० |
| ७ | २००७ | १६६३२ |
| ८ | २००८ | १६७९६ |
| ९ | २००९ | १७३६८ |
| १० | २०१० | १५९६४ |
| ११ | २०११ | १४०२७ |
| १२ | २०१२ | १३७५४ |
| १३ | २०१३ | ११७७२ |
| १४ | २०१४ | १२३६० |
| १५ | २०१५ | १२६०२ |

Source : National Crime Record Bureau

## भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे

भारतातील शेतकऱ्याच्या आत्महतेची कारणे पुढील मुद्दया दवारे स्पष्ट करता येतील.

### १. शेतीमालाला मिळणारा कमी भाव

केंद्र सरकारच्या शेतीविषयक धोरणामुळे शेतकरी चहुबाजूंची नागवला जात आहे. गेल्यावर्षी म्हणजेच २०१५-२०१६ मध्ये तुरीचा भाव क्विंटल ११००० रु. होता तो आज २०१६-२०१७ मध्ये ४००० रु. झाला शेतकऱ्यांकडे साठवणुकीची क्षमता नसल्यामुळे व पैशाची नितांत गरज असल्यामुळे तो पीक काढणी झाली की शेतमाल विक्रतो. व्यापारी हे शेतमाल कमी भावाने खरेदी करता नंतर तोच माल जास्त भावाने विकतात. शेतीमालाच्या भावाचे चढ-उतार हे शेअर बाजार, सोने यांच्यापेक्षा जास्त पटीने असतात. दररोज ८०० ते १००० रू.



Scanned by Scanner Go

261



खाउजा धोरण : शेतकऱ्यांचे मरण........ प्रा.डॉ. मधु सावंत........ 100-104
डा. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार........ प्रा. डॉ. सोमनाथ गुंजकर........ 105-106
भारतीय शेती, शेतकरी व पशुधन : एक दृष्टीक्षेप........ प्रा. डॉ. परशुराम पाटील........ 107-108
भारतीय कृषी क्षेत्रातील गुंतवणूक........ देशमुख नयना निवृत्तीराव........ 109-111
आवश्यक वस्तू कायद्याचे शेतीवरील परिणाम........ डॉ.विकास विनायकराव सुकाळे........ 112-114
भारतीय शेतीसंबंधी राजकिय दृष्टिकोण........ स्वामी विरभद्र गुरप्पा........ 115-116
कृषी विपणन : वास्तव आणि अपेक्षा........ प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे........ 117-119
भारतीय शेतीचे आधुनिकीकरण : दशा आणि दिशा........ प्रा.डॉ. अनिल दि. वाडकर........ 120-124
भारतातील शेतमाल विपणन व्यवस्था : समस्या आणि उपाय........ प्रा.राम शेवलीकर........ 125-127
हवामान बदल व भारतीय शेती........ प्रा.अमोल अरुण पगार........ 128-130
शेतमाल विपणनाच्या समस्या आणि उपाय........ प्रा.डॉ.अविनाश विलासराव पवार........ 131-134
शेतकऱ्यांच्या आत्महत्या........ डॉ.कोंडेवार स्मिता उमाकांतराव........ 135-140
भारत में कृषि यन्त्रीकरण........ डॉ. जुझारसिंघ निर्मलसिंघ सिलेदार........ 141-142
किसान आत्महत्या की समस्याएँ : गोदान के विशेष संदर्भ में........ डॉ. भगवान जाधव........ 143-145
शेतमाल विपणनच्या समस्या........ प्रा.तोंडारे विजय नागनाथ........ 146-148
शेषराव मोहिते यांचे शेतकरी चळवळीतील योगदान........ प्रा. व्यंकटी दत्तात्रय जाधव........ 149-151
नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याचे विश्लेषण (२००३ ते २०१७)........ प्रा. एस. टी. जनकवाडे........ 152-153
भारतीय शेतीचे आधुनिकीकरण : दशा आणि दिशा........ पाटील संतोष बालाजी........ 154-158
प्रा. मुळे संतोष अशोकराव
भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि उपाययोजना........ भोसले सीमा विश्वनाथ........ 159-163
भारतीय शेतीसमोरील शेतकरी आत्महत्या : एक आव्हानमारोती........ सदाशिव कदम........ 164-167
भारतीय शेतीचे आधुनिकीकरण दशा आणि दिशा........ होगे राधाकिशन आंबादासराव........ 168-171
भारतीय शेतीसंबधी सरकारचे धोरणे........ प्रा. माने एल.आर........ 172-174
महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी........ प्रा.डॉ.शिवाजी पाते........ 175-177
जमीन धारण कायद्याचे स्वरूप आणि महत्व........ डॉ. कविता गंगाधर सोनकांबळे........ 178-180
भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्या : एक चिकित्सक अभ्यास........ डॉ.एस.एस. देवनाळकर........ 181-183
जागतिकीकरण आणि भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय चिंतन........ डॉ. नारायण तु. कांबळे........ 184-190
भारताच्या आर्थिक विकासात सेंद्रिय शेतीचे महत्व........ डॉ. ज्योती महाजन........ 191-193
शेतकरी आत्महत्या सद्यस्थिती : कारणे आणि उपाय........ प्रा. डॉ. शाहूराज मूळे........ 194-196
मराठी साहित्यावर शेतकरी चळवळीचा प्रभाव........ प्रा.डॉ. बालाजी पोतुलवार........ 197-199
भारतीय शेतीची सद्यस्थिती व आव्हाने........ डॉ. बाजीराव वडवळे........ 200-201
शेतमाल विपणनाच्या समस्या आणि उपाययोजना........ डॉ. मिनाक्षी निवृत्तीराव कोंगे........ 202-204
शेती, शेतकरी आणि प्रसारमाध्यमे — प्रा.डॉ. विशाल रावसाहेब पतंगे 205-207
महाराष्ट्रातील शेतमाल विपणन - एक दृष्टिक्षेप........ प्रा.डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव........ 208-210
भारतीय शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय........ डॉ. एस.एस. पतंगे........ 2011-214
शेतमाल किंमत व ग्राहक........ प्रा.डॉ.करकरे सी.पी........ 215-218
भारतीय शेतीसंबंधी सरकारी योजना आणि अनुत्तरित प्रश्न........ डॉ. कांतराव प्र. पोले........ 219-220

261

Scanned by Scanner Go